**<u>प्रसिध्दी पत्रक</u>** **दिनांक २२/०३/२०२४**

आरोपी लोकसेवक- 1) श्री. ऋषिकेश श्रीरंग इंगळे, वय 26 वर्षे, पद- सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक ( कंत्राटी ) नेमणुक- स्मार्ट सिटी कार्यालय महानगरपालीका छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 40000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे बेगमपुरा,छत्रपती संभाजीनगर(शहर) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. ऋषिकेश श्रीरंग इंगळे, वय 26 वर्षे, पद- सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक ( कंत्राटी ) नेमणुक- स्मार्ट सिटी कार्यालय महानगरपालीका छत्रपती संभाजीनगर, रा. ग.नं.138 प्लॉट नं.39 छत्रपती नगर, सातारापरिसर छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | :- | 40000/- |
| लाच स्विकृती रक्कम | | 40000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्रीमती संगिता पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार हे साई एजन्सी येथे कामास असून साई एजन्सी यांनी स्मार्ट सिटी बस क्लिनिंगच्या कामाचे चार महिण्याचे एकुन बील 7,26,235/- रुपये काढण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार हे साई एजन्सी येथे कामास असून साई एजन्सी यांनी स्मार्ट सिटी बस क्लिनिंगच्या कामाचे चार महिण्याचे बील 7,26,235/-रुपये काढण्यासाठी आरोपी लोकसेवक ऋषिकेश श्रीरंग इंगळे यांनी तक्रारदार यांच्याकडे 40000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.22/03/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से.ऋषीकेश श्रीरंग इंगळे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 40000/-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आज दि. 22/03/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. ऋषीकेश श्रीरंग इंगळे यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष स्मार्ट सिटी कार्यालय गेट जवळ 40000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन बेगमपुरा, छत्रपती संभाजीनगर शहर येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगिता पाटील यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार राजेंद्र सिनकर, पो.अं. विलास चव्हाण, चालक सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.